16-17

(24)

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. २८१९ २८२८.

## अंतर्गत लेखापरिक्षण विभाग

जा.क्र.मनपा/मुलेप/९६२/२०१६-१७ दि.०६/१०/२०१६

प्रति,
श्री. राजेश के.
शॉप नं ७,संधवी टॉवर, हाटकेश समोर,
उद्योग नगर, मिरा भाईंदर रोड
मिरारोड (पु)

विषय :- केंद्रशासन माहिती अधिकार अधिनियम २००५
संदर्भ :- आपला दि.१९/०८/२०१६ रोजीचा माहितीच अधिकार अंतर्गत अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडुन या विभागास प्राप्त दि. २६/०९/२०१६ रोजीचा अर्ज

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, केंदशासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपण पत्रात मागणी केल्याप्रमाणे दि. ०१ जुलै २०१६ ते दि. १५ ऑगस्ट २०१६ पर्यत मा. आयुक्त सो यांच्या कडुन आलेली पत्र/आदेशा बाबतच्या प्रति एकुण १५ होत असुन प्रति प्रत २ रु प्रमाणे एकुण रक्कम रुपये ३०/- भरणा करुन संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रतीची माहिती घेऊन जावे.

माहिती अधिकारी यांचे या माहितीमध्ये समाधान न झाल्यास पत्र प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसांत प्रथम अपिल अधिका-यांकडे अपिल दाखल करण्यात यावे.

कळावे,

(चिंतामण शिंदे)
माहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरिक्षक
लेखापरिक्षण विभाग

प्रथम अपिल अधिकारी
श्री.सु.म. निपाणे
मुख्यलेखापरिक्षक
लेखापरिक्षण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

भारतीय डाक
India Post

SP BHAYANDER <401101>
EM147996334IN
Counter No:1,OP-Code:6
To:RAJESH K,SANGHAVI TOWER
MIRA ROAD, PIN:401107
From:MBMC , BHAYANDER WEST
Wt:20grams,
Amt:17.00 ,07/10/2016 ,10:52
Taxes:Rs.2.00<<Track on www.indiapost.gov.in>>

मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

जा. क्र. मनपा/सा.प्र./९७०४/२०१६-१७

दि.२३/८/२०१६.

प्रति,

जनमाहिती अधिकारी,

लेखा परिक्षक विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

लेखा परिक्षण विभाग
आवक:- २४
दिनांक:- २६/०८/२०१६

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५

संदर्भ :- श्री. राजेश के. यांचा दि. २३/०८/२०१६ चा अर्ज.

महोदय,

विषयांकित बावत संदर्भिय माहितीच्या अधिकाराखालील पत्राच्या अनुषंगाने कळविणेत येते की, सदर अर्जात अर्जदार यांनी अपेक्षिलेली आपल्या विभागाकडील माहिती अर्जदार यांना परस्पर देण्यात यावी व त्याची एक प्रत सामान्य विभागास अवगत करावी.

सोबत, संदर्भिय माहितीच्या अर्जाची छायांकित प्रत.

श्री. शिंदे

(हेमंत पाटील)
जनमाहिती अधिकारी तथा
विभाग प्रमुख (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

F:\Harshala\Mahiticha Adhikar\Rajesh K..docx

सा.प्र
९८०१६
२३/८/१६
आयुक्त

# केंद्र शासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार - २००५

## नमुनापत्र - ३

## माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

10 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES 1 JUL 2016

प्रति,
**मा. शासकीय माहिती अधिकारी साहेब,**
तथा मा. आयुक्त सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | राजेश के. (मो.क्र. ९४०५३७४६०५) |
| २ | पत्ता | शॉप नं. ०७, सांघवी टॉवर, हाटकेश समोर, उद्योग नगर, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड (पुर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७. |
| ३ | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल | दि. ०१ जुलै, २०१६ ते दि. १५ ऑगष्ट २०१६ पर्यंत मा. आयुक्तांकडे आलेली पत्र, मा. आयुक्तांनी दिलेले आदेश, दिलेल्या मंजू-या व मा. आयुक्त यांच्याकडून शासनास सादर केलेल्या टिपण्या/अहवाल तसेच शासनाकडून मा. आयुक्तांस झालेला पत्रव्यवहार व त्याची आवक जावक रजिस्टरची नोंदीची प्रत देण्यात यावी. |

| | |
|---|---|
| (एक) माहितीचा विषय | |
| (दोन) माहितीशी संबंधित कालावधी | वरीलप्रमाणे |
| (तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | |
| (चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे | व्यक्तीशः |
| (पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत, शिघ्र) | सर्वसाधारण |
| (सहा) ज्यासाठी माहिती आवश्यकता आहे ते प्रयोजन | खाजगी कामासाठी |
| (सात) अर्जदार दारिद्रय रेषेखाली आहे का? | नाही |

ठिकाण :- मिरा रोड (पुर्व)

दिनांक :- १९/०८/२०१६.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**लेखा परिक्षण विभाग**
आवक:- १७
दिनांक:- ५/७/१६

जा.क्र.मनपा/सा.प्र./६५२/२०१६-१७
सामन्य प्रशासन विभाग
दि.०४/०७/२०१६

विषय :- मिरा भाईंर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील व पदपथावरील अतिक्रमणे हटविणे बाबत.

संदर्भ :- मा.महासभा दि.२८/०६/२०१६ रोजीची मा.आमदार तथा सदस्य, श्री.नरेंद्र मेहता यांची लक्षवेधी.

## कार्यालयीन आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील रस्ते व पदपथ यावर मोठया प्रमाणात फेरीवाले व अन्य व्यवसायीक यांनी अतिक्रमण करुन रहदारीस अडथळा निर्मा[illegible] दि. २८/०६/२०१६ रोजीच्या मा.महासभेमध्ये मा.आमदार तथा सदस्य, श्री.नरेंद्र मेहता यांनी लक्षवेधी मांडली होती. सदर लक्षवेधीच्या अनुषंगाने ठोस कारवाई करणेसाठी दि.०७/०७[illegible] मोहिम राबविण्याचे निश्चीत करण्यात आले आहे. त्याकरीता खालील प्रमाणे नियंत्रण अधिकारी यांच्या अधिपत्याखाली पथके तयार करुन जबाबदारी देण्यात येत आहे.

नियंत्रण अधिकारी – १) श्री विजयकुमार म्हसाळ, उप-आयुक्त (मु.)/ श्री.शरद बेलवटे, मुख्य लेखाधिकारी – प्रभाग समिती क्र. ०१ व ०२
२) श्रीम.स्वाती देशपांडे, सहा.आयुक्त/ श्री.हरेश पाटील, नगरसचिव - प्रभाग समिती क्र. ०३
३) श्रीम.कल्पिता पिंपळे, सहा.आयुक्त/ श्री.हरेश पाटील, नगरसचिव - प्रभाग समिती क्र. ०४
४) श्री.संभाजी पानपट्टे, उप-आयुक्त/ ~~श्री.~~भागवत मुरकुटे, मुख्य लेखापरीक्षक - प्रभाग समिती क्र. ०५ व ०६

| पथक क्र. | पथक प्रमुख / सहा.पथक प्रमुख | पथकातील अधिकारी | कारवाईचे ठिकाण | कारवाई दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शरद नानेगावकर, उप-अभियंता (पथक प्रमुख)<br><br>श्री. स्वप्निल सावंत, प्रभाग अधिकारी (सहा.पथक प्रमुख) प्रभाग क्र. ०१ - ८४२२८११४०१ | श्री.गोविंद परब, सहा.आयुक्त,<br>श्री. उमेश अवचर, कनिष्ठ अभियंता- ८४२२८११२२३<br>श्री.सतिश तांडेल, कनिष्ठ अभियंता<br>श्री. भैरु नाईक, ९९८७२३८६७९<br>फेरीवाला निर्मुलन पथक प्रमुख, | १) भाईंदर (प.) मॅक्सेस मॉल परीसर<br>२) भाईंदर (प.) पोलीस चौकी परीसर<br>३) भाईंदर पोलीस चौकी ते सुभाषचंद्र बोस मैदान<br>४) भाईंदर स्टेशन परीसर ते मच्छीमार्केट<br>५) डी-मार्ट परीसर | दि. ०७ जुलै २०१६<br>सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०[illegible]<br>**(पथक क्र.१ व ५)**<br>दुपारी ०४.०० ते रात्री १०.००<br>**(पथक क्र.१,३ व ४)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रभाग समिती क्र. १ व २<br>(अधिनस्त कर्मचारी व साहित्यासह) | | |
| २ | श्री. विजय पाटील,<br>उप कर निर्धारक व संकलक<br>(पथक प्रमुख)<br><br>श्री.संजय दोंदे, प्रभाग अधिकारी,<br>(सहा.पथक प्रमुख)<br>प्रभाग क्र. ०२ - ८४२२८११३०९ | श्री.जनार्दन भासे, गट प्रमुख, स्था.सं.कर<br>श्री.इंम्तियाज शेख, कनिष्ठ अभियंता-९९६७८३४५८१<br>श्री. अरविंद पाटील, कनिष्ठ अभियंता<br>श्री. भैरु नाईक, ९९८७२३८६७९<br>फेरीवाला निर्मुलन पथक प्रमुख,<br>प्रभाग समिती क्र. १ व २<br>(अधिनस्त कर्मचारी व साहित्यासह) | १) शिवसेना गल्ली परीसर<br>२) ९० फिट रोड<br>३) ६० फिट रोड<br>४) खाउ गल्ली परीसर<br>५) बालाजी नगर परीसर<br>६) स्टेशन रोड परीसर<br>७) टेलिफोन ऑफीस परीसर (MTNL) | दि. ०८ जुलै २०१६<br>सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.००<br>**(पथक क्र.२ व ६)**<br>दुपारी ०४.०० ते रात्री १०.००<br>**(पथक क्र.२,४ व ५)** |
| ३ | श्री.नितीन मुकणे, उप-अभियंता<br>(पथक प्रमुख)<br><br>श्री.अविनाश जाधव, प्रभाग अधिकारी<br>(सहा.पथक प्रमुख)<br>प्रभाग क्र. ३- ८४२२८११३६२ | श्री.हेमंत पाटील, सा.प्र.विभाग<br>श्री. संदिप चौधरी, कनिष्ठ अभियंता<br>श्री.सचिन पवार, कनिष्ठ अभियंता<br>श्री. संदिप घाडीगावकर, ८८७९३६५३६४<br>फेरीवाला निर्मुलन पथक प्रमुख,<br>प्रभाग समिती क्र. ३ व ४<br>(अधिनस्त कर्मचारी व साहित्यासह) | १) जेसल पार्क जैन मंदिर ते बंदरवाडी नाका<br>२) जेसल पार्क जैन मंदिर ते राहुल पार्क<br>३) एस व्ही रोड ते जेसल पार्क खाडी<br>४) बंदरवाडी ते नवघर नाका<br>५) नवघर नाका ते एस.एन कॉलेज<br>६) सादुराम गल्ली ते परम मसाला<br>७) मच्छी मार्केट ते दळवी चाळ<br>८) विजय पंजाब हॉटेल ते केबीन नाका<br>९) जेसल पार्क ते आतील बाजु<br>१०) दिलीप दावर प्रवेशद्वार आतील बाजु<br>११) तलाव रोड आतील बाजु | दि. ११ जुलै २०१६<br>सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.००<br>**(पथक क्र.३ व १)**<br>दुपारी ०४.०० ते रात्री १०.००<br>**(पथक क्र.३,५ व ६)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री.यतिन जाधव, प्र.उप-अभियंता (पथक प्रमुख)<br><br>श्री.सुनिल यादव, प्रभाग अधिकारी, (सहा.पथक प्रमुख) प्रभाग क्रं. ०४ - ८४२२८११५०७ | श्री.चिंतामण शिंदे, उपमुख्यलेखापरिक्षक<br>श्री. कुंदन पाटील, कनिष्ठ अभियंता- ९४२१५७६०९४<br>श्री.प्रशांत जानकर, कनिष्ठ अभियंता<br>श्री. संदिप घाडीगावकर, ८८७९३६५३६४<br>फेरीवाला निर्मुलन पथक प्रमुख,<br>प्रभाग समिती क्र. ३ व ४<br>(अधिनस्त कर्मचारी व साहित्यासह) | १) गोल्डन नेस्ट ते फाटक रोड (एक बाजु)<br>२) साईबाबा मंदिर फाटक नवघर नाका (दोन्ही बाजु)<br>३) गोडदेव तलाव (दोन्ही बाजु)<br>४) अभिनव स्कुल ते गोडदेव तलाव (दोन्ही बाजु)<br>५) गोडदेव नाका ते केबीन नाका (बी पी रोड) (दोन्ही बाजु)<br>६) नर्मदा नगर केबीन रोड (दोन्ही बाजु)<br>७) नर्मदा नगर ते सत्यनारायण मंदिर खारीगाव (दोन्ही बाजु)<br>८) खारीगाव ते विजय पंजाब हॉटेल बी पी रोड (दोन्ही बाजु)<br>९) प्रभाग क्र. ३ व ४ कार्यालय (दोन्ही बाजु)<br>१०) गोल्डन नेस्ट ते स्पोर्टस कॉम्प्लेक्स (एक बाजु)<br>११) स्पोर्टस कॉम्प्लेक्स (एक बाजु)<br>१२) इंद्रलोक नाका (एक बाजु) | दि. १२ जुलै २०१६<br>सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.००<br>**(पथक क्र.४ व २)**<br>दुपारी ०४.०० ते रात्री १०.००<br>**(पथक क्र.४,१ व ६)** |
| ५ | श्री.किरण राठोड, उप-अभियंता (पथक प्रमुख)<br><br>श्री.जगदिश भोपतराव, प्रभाग अधिकारी (सहा.पथक प्रमुख) प्रभाग क्र. ५ - ८४२२८११२२६ | श्री.नरेंद्र चव्हाण, भांडार अधिकारी<br>श्री.व्ही.आर.देशमुख, शाखा अभियंता<br>श्री. भुपेश काकडे, कनिष्ठ अभियंता- ८४२२८११३२४<br>श्री.सचिन पाटील, कनिष्ठ अभियंता<br>श्री.चेतन म्हात्रे, कनिष्ठ अभियंता<br>श्री.प्रफुल्ल वानखेडे, कनिष्ठ अभियंता<br>श्री.भालचंद्र सारुक्ते- ८९७६६६०००१<br>फेरीवाला निर्मुलन पथक प्रमुख,<br>प्रभाग समिती क्र. ५<br>(अधिनस्त कर्मचारी व साहित्यासह) | १) लोढा रोड ते हैदरी चौक (दोन्ही बाजु)<br>२) निहाल कॉर्नर ते मिरा रोड स्काय वॉक पर्यंत (डावी बाजु)<br>३) एन.एच.हायस्कुल ते शिवार गार्डन (दोन्ही बाजु)<br>४) प्रविण बिल्डर्स इमारत ते एन.एच.स्कुल पर्यंत (दोन्ही बाजु)<br>५) सेक्टर १, २, ३ व ४<br>६) शांती नगर पोलीस चौकी ते सरयु माता चौक (उजवी बाजु)<br>७) मिरा रोड भाजी मार्केट ते मिरा रोड स्टेशन (दोन्ही बाजु)<br>८) शांती नगर पोलीस चौकी ते मिरा रोड स्टेशन स्टार गेट (उजवी बाजु)<br>९) एस.के .स्टोन पोलीस चौकी ते स्टेशनकडे | दि. १३ जुलै २०१६<br>सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.००<br>**(पथक क्र.५ व ३)**<br>दुपारी ०४.०० ते रात्री १०.००<br>**(पथक क्र.५,१ व २)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | येण्याची (डावी बाजु)<br>१०) सेक्टर-३ खाउ गल्ली<br>११) बानेगर गल्ली लोढा रोड (बानेगर हायस्कुल समोरील)<br>१२) मिरा रोड स्टेशन ते शितल नगर नाक्यापर्यंत<br>१३) मिरा रोड पुर्व पुनम सागर कॉम्प्लेक्स मधील अंतर्गत रस्ता<br>१४) मिरा रोड पुर्व नरेंद्र पार्क, ज्युपिटर बिल्डींग शेवटच्या दुकानापासून ते अस्मिता व्हिनटेज (दोन्ही बाजु)<br>१५) मिरा नर्सिंग होम मरियम बिल्डींग समोर ते एसडीएफसी बँक | |
| ६. | श्री.किरण राठोड, उप अभियंता,<br>(पथक प्रमुख)<br>श्री.वासुदेव शिरवळकर, प्रभाग अधिकारी<br>(सहा.पथक प्रमुख)<br>प्रभाग क्र. ६- ८४२२८११४४४ | श्री.प्रकाश कुलकर्णी, सहा.प्रभाग अधिकारी<br>श्री.बाबुराव वाघ, उप-मुख्यलेखापरिक्षक<br>श्री.शिरीष पवार, कनिष्ठ अभियंता-८४२२८११२२८<br>श्री.विकास शेळके, कनिष्ठ अभियंता-८४३३५२९४४९<br>श्री.उत्तम रणदिवे, कनिष्ठ अभियंता<br>श्री.निखील मेश्राम-८८९८५१४८२६<br>फेरीवाला निर्मुलन पथक प्रमुख,<br>प्रभाग समिती क्र. ५ व ६<br>(अधिनस्त कर्मचारी व साहित्यासह) | १) सिल्वर पार्क रस्ता (दोन्ही बाजु)<br>२) प्लेझंट पार्क (एक बाजु)<br>३) काशिगाव रस्ता (दोन्ही बाजु)<br>४) माशाचा पाडा रस्ता (दोन्ही बाजु)<br>५) हायवे काशिमिरा ते काशिगाव<br>६) शांती गार्डन रस्ता (दोन्ही बाजु)<br>७) दिपक हॉस्पिटल जवळ (दोन्ही बाजु)<br>८) रामदेव पार्क रस्ता (दोन्ही बाजु)<br>९) कनकिया रोड, सिनेमॅक्स परीसर<br>१०) इंद्रलोक फेस III रस्ता (दोन्ही बाजु)<br>११) मिरागाव रस्ता<br>१२) पेणकरपाडा रस्ता<br>१३) मिरा भाईंदर रोड (दोन्ही बाजु)<br>१४) हटकेश रोड जी.सी.सी. समोरील रस्ता (दोन्ही बाजु) | दि. १४ जुलै २०१६<br>सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.००<br>(पथक क्र.६ व ४)<br>दुपारी ०४.०० ते रात्री १०.००<br>(पथक क्र.६,२ व ३) |

वरील प्रमाणे नियुक्त केलेल्या सर्व पथकांनी एका वेळी एकाच प्रभाग समिती क्षेत्रामध्ये कार्यवाही करावयाची आहे. प्रभाग क्षेत्रामध्ये सर्व पथकांमार्फत एकत्रित कारवाई करण्यासाठी संबं प्रभागाच्या पथक प्रमुख व प्रभाग अधिकारी यांनी नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार नियोजन करावे.

टिप :- १) कारवाईसाठी दोन्ही सत्रामध्ये २ जेसीबी, ६ डंपर, ३० मजुर व आवश्यकतेप्रमाणे सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित प्रभाग अधिकारी यांची असेल.

२) सर्व प्रभाग अधिकारी यांनी व्हिडीओ कॅमेरा व फोटोग्राफी कॅमेरा ऑपरेट करण्यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची व्यवस्था करावी.

३) व्हिडीओ कॅमेरा व फोटोग्राफी कॅमेऱ्याची बॅटरी पुर्ण चार्ज असल्याची व मेमरी पुरेशी उपलब्ध असल्याची खात्री करावी.

४) वरील प्रमाणे नियुक्त केलेल्या पथकासमवेत दि. ०५/०७/२०१६ रोजी ~~दुपारी~~ सायं.५.०० वाजता संयुक्त बैठक घेण्यात येईल. बैठकीसाठी सर्व अधिकारी कर्मचारी यांनी उपस्थित राहवे.

५) पथक प्रमुख यांनी दैनंदिन अहवाल सादर करावा.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :

१) सर्व उप-आयुक्त
२) सर्व संबंधित
३) सर्व प्रभाग अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

लेखा परिक्षण विभाग
आवक:- ९८
दिनांक:- ५।७।१६

सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र.मनपा/सा.प्र./६४८/२०१६
दि.४/०७/२०१६.

**अत्यंत महत्वाचे**

## - परिपत्रक -

विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन दि.१८/०७/२०१६ पासून मुंबई येथे सुरु होत आहे. अधिवेशन कालावधीमध्ये शासनाकडून मिरा भाईंदर महानगरपालिके संबंधी तारांकित, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना व आश्वासने इत्यादी प्राप्त होत असतात. प्राप्त होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तातडीने व कालमर्यादेत शासनाकडे सादर करणे आवश्यक असते.

सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, अधिवेशन काळातील कामकाजाविषयीची माहिती/उत्तरे लेखी स्वरुपात (Hard Copy सह) मा.आयुक्त यांच्या स्वाक्षरीने, ई-मेल द्वारे देखील शासनास पाठविण्याची कार्यवाही करावी. शासना पाठविण्यात आलेली माहिती शासनाकडे पोच झाल्याबाबतची खातरजमा करणेत यावी. शासनाकडे पाठवावयाची माहिती विहित कालमर्यादेत अत्यंत तातडीने त्याच दिवशी पाठविण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या प्रश्नाबाबतची माहिती शासनाकडील संबंधित विभागाकडेच (तारांकित प्रश्नावर असलेल्या ई-मेल आयडीवर) पाठविले जाईल याची दक्षता घ्यावी.

विधानमंडळ कामकाजाचे गांभीर्य लक्षात घेता, अधिवेशनाच्या दरम्यान सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी श्री.विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त (मुख्यालय) तथा समन्वय अधिकारी यांची परवानगी घेतल्याशिवाय कार्यालय सोडू नये. विनापरवानगी कार्यालय सोडल्यास आपणावर पुढील कारवाई करण्यात येईल याची सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी स्पष्ट नोंद घ्यावी. सदर परिपत्रक सर्व अधिवेशनासाठी लागू राहील.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रतः- १) विभागप्रमुख/ खातेप्रमुख (सर्व) यांचेकडे कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांचेकडे माहितीसाठी व संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उप-आयुक्त(आरोग्य)
जा.क्र.मनपा/उपायुक्त/आ.वि./२९/२०१६-१७.
दिनांक :- ४/७/२०१६.

लेखा परिक्षण विभाग
आवक :- १८
दिनांक :- ५/७/१६

// आदेश //

भारत सरकारने स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत विविध स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. त्या अनुंषगाने पुढील आदेशान्वये आपले विभागाशी संबंधित करावयाच्या कामाचा उल्लेख आहे.

१) शासन परिपत्रक क्र.सवमअ-२०१६सं.क्र.३४९/नवि-३४/दि.१६/५/१६ नुसार मनपा/आयुक्त /३८/२०१६. दि. १८/४/२०१६ रोजीचे आदेशान्वये दि.१६/५/२०१६ ते ३१/५/२०१६ या कालावधीत महानगरपालिकेची सर्व कार्यालये, रुग्णालये, शाळेच्या इमारती स्वच्छ ठेवणेबाबत.

२) मा. प्रविण प्रकाश (आय.ए.एस.) संयुक्त सचिव एव मिशन निर्देशक (एस.बी.एम.) भारत सरकार शहरी विकास मंत्रालय यांचेकडील पत्र क्र. Do.No.MD-SBM/AA/56/2016. दि.२४/५/२०१६ नुसार मनपा/उप-आयुक्त/१६/२०१६. दि.१/६/२०१६ च्या आदेशान्वये दि.१/६/२०१६ ते १५/६/२०१६ या कालावधीत उद्याने, पार्क, मैदाने, कोंडवाडे, स्मशानभुमी इ. ठिकाणी साफसफाई करुन परिसर स्वच्छ ठेवणे.

३) शासन पत्र क्र. राक्षस/स्वच्छपार्क/७३/१६-१७. दि.१/६/२०१६ नुसार मनपा/ उप-आयुक्त/आ.वि./२०/२०१६-१७.दि.१५/६/२०१६ अन्वये दि.१/६/२०१६ ते१५/६/२०१६ या कालावधीत विशेष स्वच्छता पार्क अभियान कार्यक्रम राबविणे बाबत.

४) त्यानुसार विभागाने कोणती कार्यवाही केली याबाबत कामाचा आढावा घेण्यासाठी माझ्या दालनात दि. ७/७/२०१६ रोजी ५=00-- वा. बैठक ठेवण्यात आली आहे. तरी बैठकीस विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती घेऊन वेळेवर उपस्थित रहावे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

शिक्षण मंडळ विभाग
आवक:- २७
दिनांक:- १२/७/१६

सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र. मनपा/सा.प्र./७०७/२०१६
दि. ११/०७/२०१६.

विषय :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण सोहळयाबाबत.

## कार्यालयीन आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयाचा अनावरण सोहळा मा.ना.श्री.रामदासजी आठवले, केंद्रीय राज्यमंत्री, सामाजिक न्याय, मा.ना.श्री.विनोदजी तावडे, मंत्री, शिक्षण यांच्या शुभहस्ते व श्रीमती गिता भरत जैन, महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली आणि मान्यवरांच्या उपस्थितीत शनिवार दि.१६ जुलै २०१६ रोजी सायं. ठिक ५.३० वाजता एम.टी.एन.एल.ऑफीस समोर, फाटक रोड, भाईंदर (पश्चिम) येथे आयोजित करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रम नियोजीतपणे पार पाडणे महत्वाचे आहे. याकरीता आपली पुढील प्रमाणे कामकाजासाठी नेमणूक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव | पर्यवेक्षक/नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | मा.मंत्री महोदयांचे लायझनिंग अधिकारी | | |
| | १. मा.ना.श्री.रामदासजी आठवले, केंद्रीय राज्यमंत्री, सामाजिक न्याय | श्री.सुरेश वाकोडे, कार्यकारी अभियंता (पा.पु.) | |
| | २. मा.ना.श्री. विनोदजी तावडे, मंत्री, शिक्षण | श्री.संभाजी पानपट्टे, उपायुक्त | |
| | ३. मा.ना.श्री.राजकुमार बडोले, मंत्री सामाजिक न्याय | श्री.भागवत मुरकूटे, मुख्यलेखापरिक्षक | |
| | ४. मा.ना.श्री. एकनाथ शिंदे, मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा | श्री.शिवाजी बारकुंड, शहर अभियंता | |
| २. | रस्ते दुरुस्ती व डांबरीकरण करणे, कार्यक्रमाच्या ठिकाणी मंडप, स्टेज, खुर्च्या, ध्वनीक्षेपण यंत्रणेची (साऊंड सिस्टम) व संबंधित साहित्य वेळेत तयार करुन ठेवणे. तसेच स्टेजवर बॅनर व्यवस्था, मार्गदर्शक फलक व्यवस्था करणे. | श्री.नितीन मुकणे, उप-अभियंता | श्री.दिपक खांबीत, कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| ३. | स्टेजवरील नामफलक तयार करणे. | श्री.राजेंद्र पांगळ, सहा.नगररचनाकार | श्री.दिलीप घेवारे नगररचनाकार |
| ४. | ग्रेनाईट नामफलक | श्री.दिपक खांबीत, कार्यकारी अभियंता | श्री.शिवाजी बारकुंड शहर अभियंता |
| ५. | मान्यवरांच्या आसन व्यवस्थेबाबत फलक लावणे. | श्री.हेमंत पाटील, विभाग प्रमुख (सा.प्र.) | श्रीम.कल्पिता पिंपळे, सहा.आयुक्त (सा.प्र.) |
| ६. | निमंत्रण पत्रिका नमून्यास मान्यता प्राप्त करुन घेऊन त्या कव्हरसह छपाई करणे. | श्री.नरेंद्र चव्हाण, भांडार अधिकारी | श्री.भागवत मुरकुटे मुख्य लेखा परिक्षक |
| ७. | कर्मचाऱ्यांना कार्यक्रमास उपस्थित रहाणेबाबत आदेश निर्गमित करणे | श्रीम.कल्पिता पिंपळे, सहा.आयुक्त (सा.प्र.) | श्री.विजयकुमार म्हसाळ उपायुक्त (मुख्यालय) |
| ८. | कार्यक्रमाच्या ठिकाणी शोभेची झाडे ठेवणे, फुले, हार, पुष्पगुच्छ, नारळ, हळद, कुंकू इत्यादींची व्यवस्था करणे. | श्री.हंसराज मेश्राम, उद्यान अधिक्षक | श्रीम. कल्पिता पिंपळे, सहा.आयुक्त (सा.प्र.) |

| अ. क्र. | कामाचे नाव | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव | पर्यवेक्षक/नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| ०९. | मान्यवरांना शाल व श्रीफळ देण्यासाठी शाल व श्रीफळ तबक योग्य प्रकारे तयार करणे. | श्री.भागवत मुरकुटे, मुख्यलेखापरिक्षक | श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त |
| १०. | मान्यवरांसाठी तयार करण्यात आलेले शाल व श्रीफळचे तबक स्वागतकर्त्यांकडे देणे. | श्रीम.सई वडके, विधी अधिकारी | श्री.स्वाती देशपांडे, कर निर्धारक व संकलक |
| | | श्रीमती दिपाली पवार, समाज विकास अधिकारी | |
| ११. | कार्यक्रमाच्या ठिकाणी साफसफाई करणे. | श्री. राजकुमार कांबळे, सहा. आरोग्य अधिकारी | श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (आरोग्य) |
| | | श्री. संदिप शिंदे, मुख्य आरोग्य निरिक्षक | |
| १२. | कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका मा. खासदार, मा. आमदार, मा.पदाधिकारी, नगरसेवक / नगरसेविका यांना वाटप करण्याचे काम करणे. | श्री. कैलास म्हात्रे, लिपीक | श्री. वासुदेव शिरवळकर, प्र.नगरसचिव |
| १३. | कार्यक्रमाचे व्हिडिओ शुटींग व फोटोग्राफी करणेकामी संबंधितांना आदेश देणे. | श्री. दशरथ हंडोरे, वरिष्ठ लिपीक | श्रीम. कल्पिता पिंपळे, सहा.आयुक्त (सा.प्र.) |
| १४. | प्रभागातील सन्मा. जेष्ठ नागरिकांना सदर कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेचे वाटप करणे. | श्री. नरेंद्र पाटील, प्र. मुख्य लिपीक प्रभाग क्र.१. | श्री. स्वप्निल सावंत, प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.१ |
| १५. | प्रभागातील सन्मा. जेष्ठ नागरिकांना सदर कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेचे वाटप करणे. | श्री. नरेंद्र पाटील, प्र. मुख्य लिपीक प्रभाग क्र.२ | श्री. संजय दोंदे, प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.२ |
| १६. | प्रभागातील सन्मा. जेष्ठ नागरिकांना सदर कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेचे वाटप करणे. | श्री.कांतीलाल पाटारी वरिष्ठ लिपीक प्रभाग क्र.३ | श्री. अविनाश जाधव, प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.३ |
| १७. | प्रभागातील सन्मा. जेष्ठ नागरिकांना सदर कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेचे वाटप करणे. | श्री.जितेंद्र कांबळे वरिष्ठ लिपिक प्रभाग क्र. ४ | श्री.सुनिल यादव, प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.४ |
| १८. | प्रभागातील सन्मा. जेष्ठ नागरिकांना सदर कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेचे वाटप करणे. | श्री.प्रकाश कुलकर्णी, सहा.प्रभाग अधिकारी प्रभाग क्र.६. | श्री.वासुदेव शिरवळकर, प्रभाग क्र.६ |
| १९. | कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका मा. संपादक, पत्रकार इत्यादींना वाटप करणे. | श्री.सुर्यकांत दातीर, प्र.जनसंपर्क अधिकारी | श्री.विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त (मुख्यालय) |
| २०. | कार्यक्रमाचे ठिकाणी अग्निशमन वाहन व अग्निशमन कर्मचारी यांची व्यवस्था करणे. | श्री.प्रकाश बोराडे, प्र. अग्निशमन अधिकारी अग्निशमन विभाग | श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अग्निशमन) |
| २१. | संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणे. | श्री हेमंत पाटील, विभाग प्रमुख (सा.प्र.) | श्रीम.कल्पिता पिंपळे, सहा.आयुक्त (सा.प्र.) |
| २२. | पोलिसांकडून अधिकारी वर्गाचे परवाना पास तयार करुन घेणे व पोलिस अधिकाऱ्यांशी समन्वय साधणे. | श्री.संजय दोंदे, प्रभाग अधिकारी, प्र.क्र.०२ | श्री.विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त (मुख्यालय) |
| २३. | चहापान व्यवस्था करणे. | श्री. राजकुमार कांबळे सहा. आरोग्य अधिकारी | श्री.संभाजी पानपट्टे, उपायुक्त (आरोग्य) |
| २४. | वैद्यकीय व्यवस्था पुरविणे. | डॉ. प्रकाश जाधव वैद्यकीय आरोग्य अधिकारी | श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (वैद्यकीय) |
| २५. | कार्यक्रम स्थळी पार्किंगची सोय करणे. | श्री.जनार्दन भासे, स्थानिक संस्था कर (गटप्रमुख) | श्री.विजय पाटील, उप-करनिर्धारक व संकलक |
| २६. | रस्त्यावरील अतिक्रमणे/फेरीवाल्यांविरुध्द कार्यवाही करणे. | श्री.संजय दोंदे, प्रभाग अधिकारी, प्र.क्र.०२ | श्री.विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त (मुख्यालय) |

| अ. क्र. | कामाचे नाव | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव | पर्यवेक्षक/नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| २७. | महत्वाचे/अति महत्वाचे आदरणीय निमंत्रितांची आसन व्यवस्था करणे. | श्री.गोविंद परब, सहा.आयुक्त (घनकचरा) | श्री. सुदाम गोडसे विभाग प्रमुख, स्थासंकर |

उपरोक्त कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचेकडे सोपविणेत आलेली सर्व कामे नैतिक व वैयक्तिक जबाबदारी समजून करावयाची आहेत. त्या मध्ये कोणत्याही प्रकारची हयगय अथवा टाळाटाळ क्षम्य असणार नाही. तसे घडल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कडक शिस्त भंग विषयक कारवाई करणेत येईल, याची सर्व संबंधितांनी कटाक्षाने नोंद घ्यावी.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत- माहीतीस्तव,

१) मा.महापौर
२) मा.उपमहापौर
३) मा.सभापती, स्थायी समिती
४) मा.सभागृह नेता
५) मा.विरोधी पक्ष नेता

प्रत- संबधित अधिकारी यांना कार्यवाहीसाठी अग्रेषित

ता.क - मान्यवरांसाठी माहीतीपुस्तिका तयार करणे.
श्री.दिपक खांबीत, कार्यकारी अभियंता (सार्व.बांधकाम)

लेखा परिक्षण विभाग
आवक:- २२
दिनांक:- १३/७/१६

# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./७९४/२०१६
दि. १३/०७/२०१६

विषय :- श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त यांचेकडे पशुसंवर्धन विभागाचा कार्यभार हस्तांतरीत करणेबाबत.

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.मनपा/आयुक्त/५८/२०१६-१७, दि.२१/०६/२०१६.
२) मा.उपायुक्त (मुख्यालय) यांचेकडील आदेश जा.क्र.मनपा/सा.प्र/१९६/२०१६, दि.०३/०५/२०१६.

आदेश

महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता येण्याच्या दृष्टीकोनातून संदर्भिय आदेश अधिक्रमित करण्यात येत असून, श्री. विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त (मुख्यालय) यांचेकडील पशुसंवर्धन विभागाचा कार्यभार श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (आरोग्य/वैद्यकीय) यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (आरोग्य/वैद्यकीय) यांनी पशुसंवर्धन विभागाचे कामकाज सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय विभागतील अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत करणेत यावे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
१. श्री. विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त (मुख्यालय)
२. श्री. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (आरोग्य/वैद्यकीय)

प्रत-
१. मा.महापौर
२. मा.उपमहापौर
३. मा.सभापती, स्थायी समिती सभा
४. मा.सभागृह नेता
५. मा. विरोधी पक्षनेता
६. मुख्यलेखापरिक्षक
७. मुख्यलेखाधिकारी
८. सर्व संबंधीत विभागप्रमुख
९. निवडनस्ती

D:\DG\Adesh\adesh.doc

लेखा विभाग
क्र.:- २५
दिनांक:- १९।७।१६

# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग,
जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./ ८०५ /२०१६
दि. १८।०७।२०१६

मिरा भाईंदर महानगरपालिका

आदेश

श्री. जगदिश काळुराम भोपतराव, प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.०५, मिरारोड (पूर्व) हे त्यांची पत्नी आजारी असल्याने त्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी दि.१८/०७/२०१६ ते दि.१२/०८/२०१६ पर्यंत वैद्यकीय रजेवर आहेत.

श्री. जगदिश काळुराम भोपतराव, प्रभाग अधिकारी यांचा कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपविणे आवश्यक आहे.

श्री. जगदिश काळुराम भोपतराव, प्रभाग अधिकारी यांचेकडे असलेला प्रभाग अधिकारी प्रभाग कार्यालय क्र.०५ या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. बाबुराव वाघ, सहाय्यक लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग यांचेकडे अतिरिक्त स्वरुपात सोपविण्यात येत आहे. श्री. बाबुराव वाघ, सहाय्यक लेखापरीक्षक, यांनी त्यांचेकडील मुळ कामकाज सांभाळून प्रस्तुत कामकाज अतिरिक्त सांभाळावयाचे आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१) श्री. बाबुराव वाघ, सहाय्यक लेखापरीक्षक,
लेखापरीक्षण विभाग
२) श्री. जगदिश काळुराम भोपतराव, प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.०५

प्रत माहितीस्तव :-

१) मुख्यलेखापरिक्षक
२) मुख्यलेखाधिकारी
३) प्रभाग कार्यालय क्र.०५
४) निवडनस्ती



D:\DG\Adesh\Atirikta_Padbhar.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

लेखा परिक्षण विभाग
आवक:- २८
दिनांक:- २६|७|१६

जा.क्र.- मनपा/सा.प्र / ८२६ / २०१६-१७
**सामान्य प्रशासन विभाग,**
दि. २५/०७/२०१६.

**वाचा:** सामान्य प्रशासन विभागाचे आदेश क्र.मनपा/सा.प्र./७८८/१६-१७ दि. १९/०७/१६

**शुध्दीपत्रक**

उपरोक्त कार्यालयीन आदेशान्वये माझाशी सल्लामसलत केल्या शिवाय कोणत्याही वृत्तपत्र अथवा इतर प्रसिध्दी माध्यमांना प्रशासकीय कामकाजाबाबत परस्पर माहिती देवू नये. अशा सुचना देण्यात आल्या होत्या. या आदेशाचा आपणाकडून विपर्यास करण्यात आला असून साहेबांनी वृत्तप्रतिनिधीशी बोलण्यास बंदी केली असा लावण्यात आला आहे. या आशयाच्या तक्रारी वृत्तप्रतिनिधीनी आमच्या समवेत व्यक्त केल्या.

या सुधारीत आदेशान्वये आपणांस सुचित करण्यात येते की, आपण, आपणास नेमून दिलेल्या विभागाचे विभाग प्रमुख/खाते प्रमुख म्हणून जबाबदार अधिकारी आहात. आपणास मा. आयुक्तांनी अधिकार प्रदान केलेले आहेत. आपल्या विभागाचे काम करीत असताना त्यामध्ये वृत्तप्रतिनिधी व अथवा इतर प्रसार माध्यमांनी काही त्रुटी अथवा प्रकल्पाची माहिती विचारली असता अभ्यासपूर्वक व जबाबदारीने माहिती देणे ही आपली नैतिक व वैयक्तिक जबाबदारी आहे. आपणाकडून वृत्तप्रतिनिधी व प्रसार माध्यमांना चुकीची माहिती दिली जाणार नाही यांची दक्षता घ्यावी.

अच्युत हांगे
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१. सर्व उपायुक्त
२. सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमुख
३. मूळ नस्ती

# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र./मनपा/सा.प्र./C23 /२०१६
दि. २५ /०७/२०१६

लेखा परिक्षण विभाग
आवक:- २९
दिनांक:- २६।७।१६

आदेश

विषयः- अतिरिक्त कार्यभार सोपविणेबाबत.
संदर्भः- जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./C22/२०१६ दि.२५/०७/२०१६

उपरोक्त संदर्भान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेतील श्री.भागवतं मुरकुटे, मुख्यलेखापरीक्षक यांची बदली उपसंचालक, विक्रीकर आयुक्त कार्यालय, मुंबई शहर या पदावर झाली असुन त्यांना दि.२५/०७/२०१६ रोजी मध्यान्होपुर्व कार्यमुक्त करण्यात आले आहे.

सबब, श्री.सुरेश घोलप, सहा.मुख्यलेखाधिकारी यांचेकडे मुख्यलेखापरीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात येत आहे. कार्यभार स्विकारुन तसा अहवाल सादर करावा.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
२५/७/16

प्रति,

श्री.सुरेश घोलप,
सहा.मुख्यलेखाधिकारी,
लेखा विभाग.

प्रतः-

१) उपायुक्त (मुख्यालय)
२) अंतर्गत लेखापरीक्षण विभाग
३) लेखा विभाग
४) सामान्य प्रशासन विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. मनपा/पा.पु./ ८५०/२०१६-१७,
पाणी पुरवठा विभाग
दि. २९/०७/२०१६.

**संदर्भ** :- १. सामान्य प्रशासन विभागाचे आदेश क्र.
मनपा/सा.प्र./८४७/१६-१७ दि.२७/०७/२०१६.
२. श्री. राठोड, उपअभियंता यांचे पत्र क्र.
मनपा/पापु/९४१/१६९-१७ दि. २८/०७/२०१६.

लेखा परिक्षण विभाग
आवक :- ३०
दिनांक :- २९।७।१६

**कार्यालयीन आदेश**

श्री. किरण राठोड, उपअभियंता, यांची प्रशासकीय कामकाजामध्ये सुसूत्रता येण्याकरीता अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागात बदली करण्यात आलेली आहे.

बदली आदेशानुसार श्री. राठोड, उपअभियंता हे दिनांक २८/७/२०१६ रोजी विभाग प्रमुख, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागात रुजू झाले आहेत. त्यामुळे उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग हे पद रिक्त आहे.

या आदेशाव्दारे, श्री. श्रीकृष्ण मोहीते, कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांना प्र. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे. त्यांनी त्यांचेकडील असलेले पाणी पुरवठा विभागाचे कामकाज सांभाळून प्र. उपअभियंता, पाणी पुरवठा या पदाचे कामकाज करावयाचे आहे.

तरी, श्री मोहीते यांनी तात्काळ प्र. उपअभियंता, पाणी पुरवठा पदाचा कार्यभार स्विकारुन तसा अहवाल आजच या कार्यालयास द्यावा. याबाबत राजकिय किंवा बाह्य दबाव आणल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ चे कलम २३ अन्वये कार्यवाहीस पात्र रहाल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
**श्री. श्रीकृष्ण मोहीते**
कनिष्ठ अभियंता,
पाणी पुरवठा विभाग

प्रत:

१) उप-आयुक्त (मुख्यालय)
२) मुख्यलेखापरिक्षक
३) मुख्यलेखाधिकारी
४) शहर अभियंता